महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

क्रमांक:१८८३९/क-3
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक: 09 DEC 2021

## :: परिपत्रक ::

**विषय : ई-कुबेर(e-kuber) प्रणालीमार्फत त्रयस्थ अदाता यांच्या बँक खात्यात थेट रकमा जमा करणेबाबत.**

**संदर्भ : १) वित्त विभाग, शा.नि.क्र.२०२०/प्र.क्र.६/२०/कोषा प्रशा-५, दि.११/०३/२०२०**
**२) वित्त विभाग, शा.परिपत्रक क्र: संकीर्ण२०२१/प्र.क्र.३०/२१/कोषा प्रशा-५, दिनांक ०७/०४/२०२१**
**३) वित्त विभाग, शा.नि.क्र.संकीर्ण२०२०/प्र.क्र.६/२०/कोषा प्रशा-५, दि.१२/११/२०२१**
**४) अधिदान व लेखा कार्यालय यांचे परिपत्रक क्र. अलेका/संगणक शाखा/ ई-कुबेर परिपत्रक २०२१-२२.**

महाराष्ट्र शासन वि. वि. शा.नि.क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र. ६/२० /कोषा प्रशा-५, दि. ११/३/२०२० अन्वये आहरण व संवितरण यांना होणारी सर्व प्रकारांची प्रदाने (त्रयस्थ अदाता वगळता ) ही मार्च २०२० पासून ई-कुबेर प्रणालीद्वारे आहरण व संवितरण अधिकारी यांच्या, खात्यात माहे ऑगस्ट २०२० कोषागार स्तरावरील CMP प्रणालीच्या धर्तीवर आहरण संवितरण अधिकारी यांच्याकडून सेवार्थ प्रणालीतून सादर होणारे देयकांचे प्रदाने ई-कुबेर बल्क पेमेन्टद्वारे थेट अधिकारी / कर्मचारी यांच्या बॅक खात्यात जमा करण्याची कार्यवाही अंमलात आलेली आहे.

आता त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.६/२०/कोषा प्रश्न-५/ दिनांक १२/११/२०२१ च्या शासन निर्णयानूसार आहरण व संवितरण अधिकारी यांच्या कार्यालयातून सादर होणाऱ्या देयकांचे प्रदाने त्रयस्थ अदाता मागणीदार, पुरवठादार, कंत्राटदार, अनुदान प्राप्त संस्था, कर्मचारी किंवा शासनाच्या विविध योजनांचे लाभार्थी यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याबाबत आदेशित केले आहे. त्याअनुषंगाने आहरण व संवितरण अधिकारी यांनी कंत्राटदार/पुरवठादार(vendor) व इतर कार्यालय (other office) यांची प्रदाने करताना प्रथम बीम्स प्रणालीमध्ये (Beams DDO Login) त्रयस्थ अदाता नोंदणी (Registered)

करणे आवश्यक आहे. त्यानुसार सचिवालयातील कक्षांनी त्यांच्याशी संबंधित मागणीदार, कंत्राटदार, पुरवठादार, अनुदान प्राप्त संस्था, शासनाच्या विविध योजनांचे लाभार्थी यांना त्यांच्या बँक खात्याच्या रद्द केलेल्या धनादेशाची मुळ प्रत(ORIGNAL CANCAL CHEQUE) आधार कार्ड व पॅन कार्डची साक्षांकित प्रत या शाखेत (क-३(लेखा) शाखेत) दिनांक २०/१२/२०२१ पर्यंत जमा करण्याबाबत कळविण्यात यावे.

सदर कार्यप्रणालीची अमंलबजावणी दिनांक १/१/२०२२ पासून करावयाची असल्याने संबंधित कक्षांनी त्यांच्याशी संबंधित मागणीदार, कंत्राटदार, पुरवठादार, अनुदान प्राप्त संस्था, शासनाच्या विविध योजनांचे लाभार्थी यांना उपरोक्त माहिती विहित मुदतीत या शाखेत सादर करण्याबाबत कळविण्यात येत आहे. जेणेकरुन या शाखेस पुढील कार्यवाही करणे सुलभ होईल.

(क.तु. डोके)
**कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी**

**याची प्रत:**

१) **महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष**

२) **निवडनस्ती**